# लिखित संगीताच्या दिशेने

## अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - साहित्य सहकार, संपा. ग त्र्यं माडखोलकर, साहित्य सहकार संघ लि., मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय प्रकाशन, जून १९६९)

भारतीय संगीत आणि पाश्चात्त्य संगीत यांच्यात फरक काय असा प्रश्न कोणी विचारल्यास दोन चार गोष्टींचा उल्लेख हमखास करण्यात येतो. पाश्चात्त्य संगीत लिहिलेले असते. त्यांच्याकडील गायक-वादक समोर ठेवलेल्या संगीतालेखाप्रमाणे (म्यूझिक स्कोअर) चालत असतात आणि आमच्याकडे असे नसते, हा एक भेद त्यातलाच होय. या भेदाबरोबरच अर्थात लिखित रूपामुळे पाश्चात्त्य संगीत अधिक बंदिस्त होते, त्यामुळे कलावंताला आविष्कारस्वातंत्र्य कमी मिळते इत्यादी विधानेही केली जातात. या उलट भारतीय कलावंत हा असा बांधला जात नसल्याने, समोर आहे - (कागदावर छापलेल्या वा लिहिलेल्या स्वरूपात) तेच गायची वा वाजवायची त्याच्यावर सक्ती नसल्याने त्याचा अविष्कार अधिक उत्स्फूर्त असतो आणि असू शकतो असेही प्रतिपादन करण्यात येते. आणि या सर्वावर कळस म्हणजे आपण असे म्हणतो की भारतीय संगीत हे इतके सूक्ष्म आहे, इतके तरल आहे की त्याचे लिखित स्वरूप मुळी कल्पिताच येत नाही. जरा विचारान्ती पाहता हे विधान धाडसाचे आहे हे सहज ध्यानात यावे. पाश्चात्त्य अभिजात संगीत हे सूक्ष्म नाही असे म्हणताना, अनेक वाद्ये आणि त्यांचा स्वरसंवादाच्या तत्त्वानुसार होणारा उपयोग, यामुळे त्यांच्या रचनेत आढळणारे गुंतागुंतीचे आकृतिबंध (स्वर आणि लय ही दोन्ही अंगे अशा आकृतिबंधांनी युक्त असतात), मानवी आवाज ते लहान मोठ्या वाद्यांचे वैशिष्ट्यपूर्ण आवाजधर्म या साऱ्यांचा कसोशीने उपयोग करून घेण्याच्या जिद्दीने विकासित झालेले विविध संगीतप्रकार - सर्वच बाजूला ढकलले जातात. तेव्हा पाश्चात्त्यांत लिखित संगीत आहे म्हणून सूक्ष्मता नाही आणि आमच्याकडे तसे नाही हा दृष्टिकोन बेजबाबदारपणे उथळ आहे असे म्हटले पाहिजे. पाश्चात्त्य संगीत लिखित का आहे, आणि त्याच्या या लिखितपणाचा एकंदर संगीताविष्कारावर काय परिणाम होतो या प्रश्नांचे उत्तर सूक्ष्मासूक्ष्मतेबाबतच्या सरसकट शेऱ्यात नसून पाश्चात्त्य संगीताच्या स्वरूपाशी निगडीत असलेल्या काही मूलभूत वैशिष्ट्यांच्या विचारांत आहे. परिणामतः आपले संगीत कितपत लिखित आहे, कितपत लिखित होऊ शकते याचाही विचार वेगळ्या संदर्भात पाहिला पाहिजे.

वर म्हटल्याप्रमाणे पाश्चात्त्य संगीतात अशी एक प्रभावी प्रवृत्ती आहे की ज्यामुळे त्याचे लिखित स्वरूप एक अटळ परिणाम म्हणून त्याच्या विकासक्रमात अवतरले. ही प्रवृत्ती म्हणजे संगीताची 'रचना' करण्याची (कंपोज करण्याची) होय. या प्रवृत्तीमुळे संगीताविष्काराची नोंद करून ठेवणे आवश्यक ठरते. संगीताचे स्वरूप लिखित होणे ही अशा तऱ्हेने संगीत विकासातील एक अवस्था होय. पुढे ज्याचा अधिक विस्तार करावयाचा असा एक संबंधित मुद्दा असा की संगीताची ही अवस्था देशकालविशिष्ट नसल्याने (म्हणजे संगीताचे रूप एका विशिष्ट तऱ्हेने बदलल्यास ही अवस्था कुठेही अस्तित्वात येणे शक्य असल्याने) भारतीय संगीतातही काही बदल झाल्यास (आणि ते तसे होत आहेत) ती अवस्था भारतात दिसू लागेल.

आता संगीताची 'रचना' म्हणजे काय याचा थोडा अधिक विचार करू. तसे पाहिले तर कोणत्याही संगीतात रचना असणारच. स्वर आणि लय व त्याबरोबर शब्द यांचा आढळ घटक म्हणून सर्वच संगीताविष्कारात होतो आणि कोणत्याही चळवळीचे कलाकृतीत रूपांतर होणे म्हणजे घटकांची व्यवस्था होणे ओघानेच आले. घटकांची व्यवस्था लावणे यातच रचनेचे मर्म आले. पण पाश्चात्त्य संगीताबाबत रचना ही 'अधिक रचना' होते. कारण त्यांच्या संगीताविष्काराशी प्रत्यक्ष संबंध असलेल्या घटकांची संख्या आणि त्याच्या गुणवत्तेची विविधता या दोन्हींचा प्रभाव ध्यानात घेण्याजोगा असतो.

घटकांच्या संख्येचा विचार केला तरी स्वर, लय, शब्द याबरोबरच विविधतापूर्ण आवाजधर्मांनी युक्त अशी विपुल वाद्ये लक्षात घ्यायला पाहिजेत. तालवाद्ये किंवा वायुवाद्ये वा तंतुवाद्ये घ्या, सर्वच प्रकारची वाद्ये पाश्चात्त्यांकडे विपुल आढळतात आणि त्यांच्या एकंदर समृद्ध वाद्यसंगीताच्या संदर्भात पाहता वाद्ये हाही एक स्वर-लय-शब्द या बरोबरीने रचनेत लक्षात घ्यायला हवा असा एक घटक ठरतो.

मानवी आवाजांच्या गुणधर्मानुसार त्यांचे वर्गीकरण करून, खास संगीत 'रचून' त्या विविध आवाजांचा उपयोग जसा पाश्चात्त्यांच्या ऑपरा इ. संगीत प्रकारात केला जातो तोही मोठा लक्षणीय असतो. हे जे स्पेशलायझेशन होते त्यामुळेही पाश्चात्त्यांच्या संगीतसिद्धीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणारा घटक म्हणून मानवी आवाजाची गणना होते. ज्यांची व्यवस्था लावावयाची त्यांच्या संख्येत अशा तऱ्हेने मानवी आवाजही भर घालतो.

पाश्चात्त्यांची संगीत रचना ही 'अधिक रचना' असते याचे एक कारण म्हणजे संगीतसिद्धीसाठी ज्यांची जुळणी करावयाची, व्यवस्था लावावयाची त्या घटकांच्या संख्येत अधिकपणा आहे. परंतु याहीपेक्षा अधिक महत्त्वाचे कारण म्हणजे या घटकांना आणि त्यांच्या विविध गुणांना वाव देण्याची जी वाट पाश्चात्त्यांनी स्वीकारली आहे तिचे स्वरूप होय. पाश्चात्त्य संगीताविष्कार हा बहुस्वनी स्वरसंवाद (हार्मनी) म्हणजे एकावेळेस अनेक स्वर या तत्त्वानुसार होतो. ही हार्मनीची व्याख्या ढोबळ आहे पण तरीही सामूहिक आविष्करण हे तिचे प्रमुख वैशिष्ट्य लक्षात येण्यास अडचण पडू नये. पाश्चात्त्यांचे संगीत हे नेहमीच एकापेक्षा अनेक कलाघटकांना प्रत्यक्षतः कार्यरत ठेऊन वाटचाल करीत असते. या अर्थाने त्यांचा संगीताविष्कार हा आमच्यापेक्षा अधिक सामूहिक असतो हे उघड आहे. तेव्हा संगीतसिद्धांत दृष्ट्या महत्त्वाचे ठरणारे घटकही जास्त आणि शिवाय एकंदर सांगीतिक आविष्कारच मुळी अशा स्वरूपाचा की त्यामुळे एकापेक्षा अधिक घटकांना प्रत्यक्षतः महत्त्वपूर्ण आणि काहीशी स्वतंत्र कामगिरी बजावणे आवश्यक ठरावे अशी एकंदर परिस्थिती पाश्चात्त्यांच्या संगीताबाबत उत्पन्न होते. या पार्श्वभूमीवर संगीताची रचना करणे हे अधिक जरूरीचे, कलासिद्धीच्या यशस्वितेसाठी आवश्यक ठरते.

या एकंदर विवेचनाच्या संदर्भात 'रचना' या संकल्पनेची आणखी एक बाजू लक्षात घ्यायला हवी. रचना म्हणजे व्यवस्था हे तर खरेच, पण या व्यवस्था लावण्यात आविष्काराच्या दिशा निश्चितपणे आधीच दर्शवून ठेवणे याही गोष्टीचा समावेश होतो. आधी पाहिल्याप्रमाणे पाश्चात्त्यांच्या संगीताविष्कारात कार्यकारी असणारे प्रभावी घटक पुष्कळ असल्याने आणि त्यांच्या संगीताविष्कारात प्रभावी असणाऱ्या 'स्वर संवाद' पद्धतीतही सामूहिक आविष्कार अटळ असल्याकारणाने कलाविष्कार ही घटनाच मुळी कमालीच्या गुंतागुंतीची आणि नाजूक स्वरूपाची होते. संगीतसिद्धीतल्या घटकांना जर काबूत ठेवले नाही, त्यांच्या व्यक्तिभूत भूमिका या अंतिम संगीताविष्काराच्या एकंदर अभिप्रेत स्वरूपाच्या संदर्भात जर पाहिल्या नाहीत तर संगीताविष्काराची जागा सांगीतिक अराजकाने बळकावणे संभाव्य, शक्य होते. परिणामतः व्यक्तिभूत घटकांना आपापल्या आविष्काराची रुपरेखा आधीच पुरविणे, त्यांच्या शक्तीचे, सामर्थ्याचे पूर्वकल्पनेने आकलन करून त्यावर आधारित असे संगीतकल्प निर्मून या घटकांना काबूत राखणे आणि संगीताचा कल्पनेच्या पातळीवरील आविष्कार त्याच्या प्रत्यक्ष आविष्कारापेक्षा कालपातळीवर आधीच होऊ देणे हे आवश्यक ठरते.

पाश्चात्त्य संगीतात संगीत-रचनाकार हा वेगळाअसतो आणि प्रत्यक्ष संगीतकार हाही वेगळा असतो यातले प्रत्यक्ष मर्म आता लक्षात येईल. ज्या कारणामुळे संगीताची रचना करणे आवश्यक ठरते त्याचेच दोन परिणाम म्हणजे संगीताचे लेखन आणि रचनाकार (निदान पक्षी रचनेचे कार्य) आणि संगीताविष्कार करणारे संगीतकार यांचा वेगवेगळा अवतार हे होत. रचना आणि त्यानुसार त्याचा आविष्कार या दोन्हींत ज्या अनेक शक्ती अनेक तऱ्हेने गुंतलेल्या असतात त्यामुळे दोन वेगवेगळ्या व्यक्तींनी या गोष्टी करणे किंवा त्याच व्यक्तीने दोन वेगवेगळ्या वेळी रचना आणि आविष्कार यांना हात घालणे आवश्यक ठरते. संगीत लिखित स्वरूपात

आल्याने संगीतविकासातील एक स्थिर अवस्था प्रत्यक्षात अवतरते. संगीत लिखित होणे हा त्याची रचना करावयास लागणे आवश्यक असल्याचा परिणाम होय आणि ते लिहिले जाणे हा त्याच्या आविष्करणाचा, त्याच्या संगीतकाराद्वारा होणाऱ्या पुनर्रचनेचा पाया होय. रचनाकार आपली सर्जनशक्ती जणू काही त्याच्या शक्यता-सामर्थ्यांच्या रूपरेषांसह, खुणांसह गोठवून ठेवतो - म्हणजे संगीत लिहितो. आणि ते वितळवून त्यांची पुनर्रचना करणे हे संगीतकाराचे काम ठरते. संगीत-संचालक (कंडक्टर) सूत्रधार म्हणून हेच काम करतो. थोडे शुष्क उदाहरण द्यावयाचे तर असे म्हणता येईल की आपल्याला काय म्हणावयाचे ते रचनाकार सांकेतिक लिपीत बद्ध करून ठेवतो आणि त्याचे पुन्हा वाचन, उपयोजन करण्यासाठी लिपी लावण्याचे, अर्थ लावण्याचे (डीकोडिंग) काम संगीतकार करतो. सांगीतिक प्रयत्नात अंतर्भूत असलेले बहुसंख्य घटक, त्यांच्या बहुविध शक्यता, त्या राबविण्यासाठी अटळपणे अवलंबिला जाणारा सामूहिक आविष्करणाचा मार्ग यामुळे संगीताची रचना करणे हे पाश्चात्त्य संगीताच्या संदर्भात आवश्यक ठरते आणि त्याचाच एक परिणाम म्हणजे ते लिखित स्वरूपात अवतरते.

भारतीय संगीताच्या संदर्भात या साऱ्या विवेचनाचे महत्त्व अशासाठी की काही वेगळ्या कारणामुळे आमच्याही रचनाकार-संगीतकार यांच्या भूमिका कालपातळीवर तरी निदान वेगवेगळ्या काढल्या जाऊ लागल्या आहेत, आमच्याही संगीतात संगीतसिद्धीसाठी आवश्यक ते घटक संख्येने अधिक होऊ लागले आहेत आणि या घटकांना कसा वाव द्यावयाचा, त्यांच्या सामर्थ्यांचा उपयोग कसा करून घ्यावयाचा याही बाबतीत आमच्याकडे विशिष्ट स्वरूपाचे बदल होऊ लागले आहेत. या सर्वांचा संकलित परिणाम असा की संगीताची रचना करण्याच्या दिशेने आमची वाटचाल चालू आहे. आणि पर्यायाने त्याचे लेखन हे आजच्यापेक्षा संगीत-आविष्करणाच्या दृष्टीनेही महत्त्वाचे ठरण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

रेडिओचे कार्यक्रम किंवा संगीतपरिषदांतील कार्यक्रम किंवा इतरत्रही, कलाकारावर वेळेच बंधन असते. ठराविक वेळात कार्यक्रम संपविणे भागच पडते, इतकेच नव्हे तर आर्थिकदृष्ट्या (आणि कलाक्षेत्रातील त्याच्या भवितव्याच्या दृष्टीनेही) तेवढ्याच वेळात तो कार्यक्रम रंगविणेही जरुरीचे ठरते. ठराविक वेळात रंग भरलाच पाहिजे याचा प्रत्येक कलाकाराच्या संदर्भात अर्थ असा की त्याने आपल्याकडील उत्तम नग कोणते ते तयार ठेवले पाहिजेत. गाता गाता किंवा वाजवता वाजवता सुचत जाईल, कार्यक्रमास हळूहळू रंग चढेल, आवाज लागेल वा हात तापेल, बैठक खुलत जाईल, फुलत जाईल या साऱ्याच शब्दप्रयोगांना आता पडता काळ आला आहे. कलावंताला आपल्याकडील निवडक गोष्टी, आविष्कार आधीच कल्पून (visualise करून), घासून पुसून तयार ठेवाव्या लागतात. संगीताच्या आमच्याहीकडे संगीतरचना आणि संगीताविष्कार या दोन अवस्था कालपातळीवर वेगवेगळ्या अवतरू लागतात. आमचा कलावंत हा पूर्वी संगीतरचना आणि आविष्कार ह्या दोन्ही गोष्टी बऱ्याच प्रमाणात एकटाच व एकाच वेळेस करीत असे. तो मेहनत, रियाज करी तो गाण्याची वा वाजविण्याची. आणि त्याची मेहनत कार्यक्रम रंगविण्याच्या एकमेव इच्छेने सदा रंजित असते. स्वर कसा सिद्ध होईल यापेक्षा तो परिणामकारक कसा होईल याची त्याला चिंता वाटू लागली आहे. आता व्यक्ती तीच, पण तिच्या हातून संगीतरचना आणि आविष्कार दोन्हींत भेद होऊ लागला आहे. कालिक पातळीवर आणि मूलभूत सांगीतिक दृष्टिकोणाच्याही पातळीवर.

संगीतरचना आवश्यक ठरण्याची जी घटकांच्या अनेकत्वाची शर्त तीही आमच्या संगीत विश्वात आजकाल पुरी होऊ लागली आहे. गायक, दोन तंबोरे वादक, सारंगी आणि तबला एवढ्यावरच गायनाचे कार्यक्रम होणे आता अवघड झाले आहे. तंबोऱ्यांची संख्या वाढणे, पेटीची साथ, स्वरमंडळाचीही साथ, आणि गायन-वादन दोन्हीत तालवाद्यांचे झपाट्याने वाढणारे महत्त्व या सर्वांचा मिळून परिणाम एकसंध घडावा यासाठी व्यवस्था लावण्याच्या पूर्वीच्या प्रयत्नांपेक्षा आमचे यत्न अधिक कसोशीचे, अधिक सहेतुक राहू लागले आहेत हे स्वाभाविकच आहे.

घटकांची जुळणी व त्यांचे व्यवस्थितीकरण झाले. या घटकांना राबवायचे कसे याच्या तंत्रातही आमच्याकडे बदल होऊ लागला आहे. पाश्चात्त्य संगीतपद्धतीतील स्वरसंवाद पद्धतीचे प्रयोग जरी मोठ्या प्रमाणात आमच्या संगीतात शक्य नसले तरी निदान तंतुवाद्यांच्या बाबतीत तरी त्यांचा प्रवेश झाला आहे. आणि मध्येच आधारभूत असेलला स्वर बदलून आविष्कार करण्याच्या तंत्राचा तर गायनातही आढळ होऊ लागला आहे.

आमच्या संगीताची लिखित रूपाकडे वाटचाल चालू आहे याचीच ही चिन्हे होत. आमच्या संगीताविष्कारात ती किती रुजतील, त्यांचे दीर्घकालीन परिणाम काय होतील, यामुळे आमचे संगीत कोणत्या स्वरूपाचे होईल या व यासारख्या इतर अनेक प्रश्नांचा विचार आज ना उद्या आपल्याला करावा लागणार आहे. परंतु लिखित संगीत म्हणजे काय, त्यामागील मूलभूत प्रेरणा कोणत्या या विषयीचा विचार नीट झाल्याशिवाय हा विचार करणे शक्यच नाही. आजचे 'नोटेशन' हे केवळ आराखड्याच्या स्वरुपाचे आहे. आज ते तेवढे असणे पुरते, कारण आजच्या संगीताच्या प्रेरणा वेगळ्या आहेत, पण भविष्यातल्या संगीतातील बदलांची चाहूल लागल्यावर, 'नोटेशन'च्या स्वरुपाविषयीही आपली भूमिका बदलावी लागेल. आजचे नोटेशन हेच उद्याच्या लिखित संगीत स्वरूपाची नांदी ठरू शकेल.

[ **टीप :** हा सर्व विचार अभिजात संगीताच्या संदर्भात आहे. आमच्या सुगम संगीतात लिखित स्वरूप शिरलेच आहे. ]

---